# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९.१२.२०१९ रोजी (का.प.क्र.४०) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरुवार दिनांक १९ डिसेंबर २०१९ रोजी (का.प.क्र ४०) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ३.०० वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला उपाआयुक्त, श्री.सुमंत मोरे, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्रीमती सरिता अरुण बोर्डे |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १०. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ११. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १२. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १३. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| १५. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| १७. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| १८. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| १९. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| २०. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २१. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| २२. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| २३. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| २४. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायण बाखरीया |
| २५. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| २६. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| २७. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| २८. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| २९. | स.स. श्री.शेख जफर अखतर |

| | |
|---|---|
| ३०. | स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र |
| ३१. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ३२. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ३३. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ३४. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३५. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ३६. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ३७. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३८. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ३९. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ४०. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ४१. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ४२. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ४३. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ४४. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ४५. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ४६. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ४७. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ४८. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ४९. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ५०. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ५१. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ५२. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ५३. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ५४. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ५५. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ५६. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ५७. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**<u>नामनिर्देशित पालिका  सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव

२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

(यावेळी भाजपा पक्षाचे स.पालिका सदस्य डायस समोर येऊन समांतर योजने बाबत शासना कडून स्थगिती आदेश उठविण्यात यावे. अशी मागणी करतात.)

मा.महापौर :सर्वांनी जागेवर बसून घ्यावे. याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल. आपण सर्वजण मिळून शासनाकडे जाऊन मागणी करू.

(यावेळी आयुक्त म्हणुन श्री.सुमंत मोरे, उपायुक्त हे काम पाहतात.)

**विषय क्रमांक १२१४:-** **(कार्यकारी अभियंता-ड्रेनेज विभाग)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दि.१९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१६ (दक्षिण) अंतर्गत येणाऱ्या लालमाती (साईनगर) येथील ४० फुटाच्या रोडवरील चौकास (१) "साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक" असे नाव देण्यात यावे. (२) भावसिंगपुरा-भीमनगर सर्व्हे नं.१९ मध्ये बसलेल्या वसाहतीस "तक्षशील नगर" हे नाव देण्यात यावे. (३) सर्व्हे नं.११ मध्ये असलेल्या वसाहतीस "लहुजीनगर" हे नाव देण्यात यावे. (४) सर्व्हे नं.२१/२ मध्ये बसलेल्या वसाहतीस "संत रोहीदासनगर" हे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१६ (दक्षिण) अंतर्गत येणाऱ्या लालमाती (साईनगर) येथील ४० फुटाच्या रोडवरील चौकास "साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक" असे नाव देण्यास, भावसिंगपुरा-भीमनगर सर्व्हे नं.१९ मध्ये बसलेल्या वसाहतीस "तक्षशील नगर" हे नाव देण्यास, सर्व्हे नं.११ मध्ये असलेल्या वसाहतीस "लहुजीनगर" हे नाव देण्यास तसेच सर्व्हे नं.२१/२ मध्ये बसलेल्या वसाहतीस "संत रोहीदासनगर" हे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९५, शिवनेरी कॉलनी, बाळकृष्णनगर, अंतर्गत असलेल्या वसाहती विजयनगर, अजिंक्यनगर, भारतनगर या ठिकाणी बहुसंख्य अनुसूचित जाती-जमातीचे नागरीक अनेक दिवसांपासून राहतात. त्यांना लागणाऱ्या सुविधा जसे, पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन, विद्युत पथदिवे, समाज मंदिर, आरोग्य केंद्र, सिमेंट कॉंक्रीटचे पक्के रस्ते यांची ते वारंवार मागणी करतात.

करीता शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतून वरील प्रकारची विकास कामे करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून निधी प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती राजाराम मोरे **अनुमोदक:-**श्रीमती अंकिता अनिल विधाते

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९५, शिवनेरी कॉलनी, बाळकृष्णनगर, अंतर्गत असलेल्या वसाहती विजयनगर, अजिंक्यनगर, भारतनगर येथे करीता शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतून

पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन, विद्युत पथदिवे, समाज मंदिर, आरोग्य केंद्र, सिमेंट कॉक्रीटचे पक्के रस्ते ही विकास कामे करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक १२१७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत हिंदु राष्ट्र चौक ते विजयनगर चौक पर्यंत १५० मी.मी.व्यासाची डीआयके ७ जलवाहिनी टाकणे. अं.प.र.रु.५,२७,२५३/- हे काम श्री.सुरेश बी.साधवानी यांनी घेतलेले आहे. त्यांना काम करण्याचा कार्यादेश दि.११.०४.२०१८ रोजीच देण्यात आला. त्यांनी लागणाऱ्या पाईपची पण खरेदी करून काम करण्याच्या ठिकाणी आणून टाकलेले आहेत. मध्यंतरी महानगरपालिकेकडे त्यांचे पैसे थकलेले होते. करीता त्यांनी काम थांबविलेले होते. परंतु, ते आज काम करण्यास तयार आहेत. पण आता मनपा पाणीपुरवठा विभाग कार्यादेश झालेले काम, मंजुर असलेली कामे, निवीदा अंतर्गत असलेली कामे ही पुर्णत: रद्द करण्याच्या मानसिकतेमध्ये आहेत. तशा प्रकारची मंजुरी घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीसाठी वरिष्ठांकडे पाठविला आहे. काम करण्यात येऊ नये असे लेखी पत्र श्री.सुरेश बी.साधवानी यांना दिनांक ०९.१०.२०१९ रोजी ज्याचा जा.क्र./मनपा/३अ/पापू/झोन क्र.६,७,८/२०२/२०१९ अन्वये देण्यात आलेले आहे. करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यापुढे जे पाणी पुरवठ्याचे काम होणार आहेत. त्यामध्ये मागील काळात कार्यादेश झालेले काम, मंजुर काम, निवीदा अंतर्गत असलेली काम रद्द करावीत. असा नियम किंवा ठराव करण्यात आला नाही. म.जि.प्राधिकरण कामास कधी सुरुवात करेल? काम कधी पुर्ण होईल? याचा कालावधी आज सांगता येत नाही. कारण समांतर पाणीपुरवठा योजनेचे काय झाले? आपण सर्वजण त्याचे साक्षीदार आहेत.

करीता, म.जि.प्राधिकरण काम जेव्हा करेल तेव्हा पण मागील काळात मंजुर असलेले काम, कार्यादेश झालेली कामे, निवीदेअंतर्गत असलेली कामे रद्द करण्यात येऊ नयेत. ते काम मनपामार्फत पुर्ण करावीत आज शहरातील पाणीपुरवठा अवस्था फार बिकट आहे. चार दिवसांवर पाणीपुरवठा जाऊन सुध्दा नागरीकांना वेळेवर पाणीपुरवठा होत नाही. या कामासाठी मा.महापौर नंदकुमार घोडेले साहेब, मा.आ.अतुलजी सावे साहेब यांनी मोठ्या प्रमाणात नागरीकांची मागणी व पाठपुरावा बघता मोलाचे सहकार्य केलेले आहे. यावर नागरीकांना मोठे आंदोलन पण केले होते. त्यावेळेस श्री.साधवानी यांना मा.सर्वसाधारण सभेच्या दिवशी कामास सुरुवात करण्यात यावी. असे पत्र सुध्दा देण्यात आलेले आहे.

करीता, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत पाणीपुरवठा संबंधीत कार्यादेश झालेले काम, निवीदा अंतर्गत असलेले काम, मंजुर असलेली कामे सुरु करण्यात यावीत.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती ज्योती राजाराम मोरे **अनुमोदक:-**श्रीमती अंकिता अनिल विधाते

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत हिंदु राष्ट्र चौक ते विजयनगर चौक पर्यंत १५० मी.मी.व्यासाची डीआयके ७ जलवाहिनी टाकणे. अं.प.र.रु.५,२७,२५३/- हे काम श्री.सुरेश बी.साधवानी यांनी घेतलेले असून ही कामे रद्द न करता पाणीपुरवठा संबंधीत कार्यादेश झालेले काम, निवीदा अंतर्गत असलेले काम, मंजुर असलेली कामे सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२१८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन मार्फत अल्पसंख्यांक बहुल वसाहतीच्या विकासाकरीता निधीची तरतुद आहे. महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभागामार्फत औरंगाबाद

महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा या अल्पसंख्यांक वसाहतीत ड्रेनेजसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या मार्फत महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई येथे पाठविण्यात यावे.

१. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा, गल्ली नं.०८ श्री.जमिल शेख यांच्या घरापासून ते श्री.राजु घुले यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
२. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा, नुर मस्जिद पासून ते ऐतिहासीक गेट पर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
३. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा, भागात डॉ.रज्जाक यांच्या घरापासून ते मनपा शाळेपर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
४. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा भागात श्री.शेख अकबर पासून ते श्री.शेख इर्शाद यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.

करीता, वरीलप्रमाणे १ ते ४ पर्यंतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शेख जफर अख्तर **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा या अल्पसंख्यांक वसाहतीत महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभागामार्फत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी खालीलप्रमाणे निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा, गल्ली नं.०८ श्री.जमिल शेख यांच्या घरापासून ते श्री.राजु घुले यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
२. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा, नुर मस्जिद पासून ते ऐतिहासीक गेट पर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
३. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा, भागात डॉ.रज्जाक यांच्या घरापासून ते मनपा शाळेपर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
४. वॉर्ड क्र.६०, बायजीपुरा भागात श्री.शेख अकबर पासून ते श्री.शेख इर्शाद यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२१९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन मार्फत अल्पसंख्यांक बहुल वसाहतीच्या विकासाकरीता निधीची तरतुद आहे. महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभागामार्फत औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा या अल्पसंख्यांक वसाहतीत ड्रेनेजसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या मार्फत महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई येथे पाठविण्यात यावे.

१. वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा श्री.जमिल शेख यांच्या घरापासून ते श्री.राजु घुले यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
२. वॉर्ड वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा भागात श्री.जावेद मुक्करम यांच्या घरापासुन ते श्री.जमिर भाई यांच्या पर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
३. वॉर्ड क्र.४६, रेंगटीपुरा भागात श्री.साहेब खान यांच्या घरापासून ते श्री.सिकंदर भाई यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.

४. वॉर्ड क्र.४६, बुक्कलगुडा भागात सादात मस्जिद पासून ते श्री.शेख मोईन यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.

करीता, वरीलप्रमाणे १ ते ४ पर्यंतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन **अनुमोदक:-**श्री.शेख जफर अख्तर

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा येथे महाराष्ट्र शासन मार्फत अल्पसंख्यांक बहुल वसाहतीच्या विकासाकरीता ड्रेनेजसाठी खालील प्रमाणे निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा श्री.जमिल शेख यांच्या घरापासून ते श्री.राजु घुले यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
२. वॉर्ड वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा भागात श्री.जावेद मुक्करम यांच्या घरापासुन ते श्री.जमिर भाई यांच्या पर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
३. वॉर्ड क्र.४६, रेंगटीपुरा भागात श्री.साहेब खान यांच्या घरापासून ते श्री.सिकंदर भाई यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.
४. वॉर्ड क्र.४६, बुक्कलगुडा भागात सादात मस्जिद पासून ते श्री.शेख मोईन यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन करणे. अ.प.र.रु.२.९९ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११४, सातारा-देवळाई येथील दिपनगर गट नं.१६८ येथील खुल्या जागेस (ओपन स्पेस) "मा.स्व.हिंदुह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नाव देण्यात यावे. येथील नागरीकांची मागणी असल्यामुळे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११४, सातारा-देवळाई येथील दिपनगर गट नं.१६८ येथील खुल्या जागेस (ओपन स्पेस) "मा.स्व.हिंदुह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११५, सातारा गांव अंतर्गत कडेपठार मंदिर (खंडोबा मंदिर) हे तिर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी व त्याला तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळण्यासाठी येथील नागरिकांची मागणी असल्यामुळे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११५, सातारा गांव अंतर्गत कडेपठार मंदिर (खंडोबा मंदिर) हे तिर्थक्षेत्र म्हणून घोषित करुन त्यास तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११५, सातारा गांव येथील वेशी समोरील पुलाजवळ चौकास “जय मल्हार चौक” असे नाव देण्यात यावे. अशी मागणी येथील नागरीकांची असल्यामुळे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११५, सातारा गांव येथील वेशी समोरील पुलाजवळ चौकास “जय मल्हार चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९ हा नैसर्गिक रित्या उंचीवर असलेला वॉर्ड आहे या ठिकाणी पाईप लाईन द्वारे पाणी चढण्यास फार त्रास होतो. अनेक भागात पाण्याची टंचाई निर्माण झालेली असते येथे पाण्याची टाकी बांधणे अत्यंत आवश्यक आहे या बाबत अनेक वेळा मागणी करण्यात आलेली आहे. परंतु सदरील मागणीकडे दुर्लक्ष झालेले आहे.

तरी, वॉर्ड क्र.१९ अंतर्गत आरेफ कॉलनी सोसायटीच्या खुल्या जागेवर पाण्याची टाकी बांधल्यास येथील व शेजारील परिसरात सुध्दा पाणी पुरवठा सुरळीत होईल. करीता, आरेफ कॉलनीच्या खुल्या जागेवर पाण्याची टाकी बांधण्यास तथा येणाऱ्या संभावित खर्चास मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाश्मी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१९ अंतर्गत आरेफ कॉलनी सोसायटीच्या खुल्या जागेवर पाण्याची टाकी बांधण्यास तथा त्यासाठी येणाऱ्या संभावित खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२० अंतर्गत ड्रेनेज लाईन व कॉंक्रेटींगची कामे करणे अत्यंत आवश्यक असल्याने वारंवार वॉर्ड अभियंता-१ यांना पत्र देऊनही ते सदरील कामासाठी संचिका प्रस्तावित करीत नसल्याने रहिवासीयांना फार त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणी दुषित पाणी, ड्रेनेजच्या समस्या, रस्त्याची समस्या असल्याने सदरील कामे तात्काळ होणे अत्यंत गरजेचे आहे.

करीता, खालील प्रमाणे कामे मनपा अधिनियम ६७ (३) (सी) अंतर्गत मंजुर करून सदरील कामे तात्काळ करण्यासाठी संबंधीतांना आदेश व्हावे म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.२० मधील श्री.एजास भाई यांचे घरापासून ते असद क्लिनिक पर्यंत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
२. वॉर्ड क्र.२० तन्वीर शाळा जवळ श्री.मसुद कुरैशी यांच्या गल्लीत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
३. वॉर्ड क्र.२० बिस्मील्ला कॉलनी हाश्मी मस्जीद ते श्री.आरेफ भाई यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
४. वॉर्ड क्र.२० सलीम किराणा गल्लीमध्ये ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
५. वॉर्ड क्र.२० अल-अमीन शाळेच्या गल्लीत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.

**सुचक:-**श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाश्मी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२० अंतर्गत खालील प्रमाणे कामे मनपा अधिनियम ६७ (३) (सी) अंतर्गत मंजुर करून सदरील कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.२० मधील श्री.एजास भाई यांचे घरापासून ते असद क्लिनिक पर्यंत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे
२. वॉर्ड क्र.२० तन्वीर शाळा जवळ श्री.मसुद कुरैशी यांच्या गल्लीत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
३. वॉर्ड क्र.२० बिस्मील्ला कॉलनी हाश्मी मस्जीद ते श्री.आरेफ भाई यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
४. वॉर्ड क्र.२० सलीम किराणा गल्लीमध्ये ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.
५. वॉर्ड क्र.२० अल-अमीन शाळेच्या गल्लीत ड्रेनेज लाईन बदलून कॉंक्रेटींग करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या औरंगाबाद शहरात कुत्र्यांच्या संख्येत वाढ झालेली असुन त्यामध्ये बहुतांश कुत्रे आजारी असतात. त्यांना खाजेची (खुजली) लागण झालेली आहेत. त्यांच्या अंगावर जखम झालेली असल्याने ते सैरावैरा धावतात. नागरीकांच्या अंगावर जातात, वाहनाच्या मागे लागतात. त्यामुळे अपघात होत आहेत. तसेच खाजेचे कुत्रे चावल्याने नागरीकांच्या जिवितांस धोका निर्माण होत आहेत.

करीता, औरंगाबाद शहरातील मनपा हद्दीतील खुल्या जागेत अशा प्रकारच्या कुत्र्यांसाठी स्वतंत्र्य कोंडवाडा बांधुन त्यास संरक्षित भिंत बांधुन त्यामध्ये कुत्रे ठेवण्यात यावेत. त्यांचे औषधउपचार व जेवणाची व्यवस्था करण्यात यावी. यामध्ये श्वानप्रेमी व एन.जी.ओ.यांची मदत सुध्दा घेण्यात यावी. कारण यांच्या मार्फत औषध व जेवणाची व्यवस्था होऊ शकते अशा प्रकारची व्यवस्था केल्यास खाजेची लागण झालेले कुत्रे ठिक होईल व नागरीकांना त्रास सहन करावा लागणार नाही.

करीता, खाजेची लागण झालेल्या कुत्र्यांचा स्वतंत्र्य कोंडवाडा बांधण्यास मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाश्मी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील मनपा हद्दीतील खुल्या जागेत त्वचा रोग (खाजेची लागण) झालेल्या कुत्र्यांचा स्वतंत्र्य कोंडवाडा बांधण्यास व त्यांचेवर औषधोपचार करण्यास आणि यासाठी एन.जी.ओ.यांची मदत घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२० अंतर्गत आसेफिया कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट रस्ता तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर रस्त्यावरून परिसरातील नागरीकांची नियमित रहदारी असते. रस्ता रुंद असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या रस्त्याकरीता रु.५० लाख निधी मंजुर आहे. तरी वरील विषयी योग्य ती दखल घेऊन रस्ता विकसीत करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाश्मी
**अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२० अंतर्गत आसेफिया कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट रस्ता तयार करण्याकरीता रु.५० लाख निधी मंजुर असून त्यातून तातडीने रस्ता विकसीत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२०, जयभिमनगर अंतर्गत टी.बी.हॉस्पीटल ते आरेफ कॉलनी फोर्टवॉल पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर रस्त्यावरून परिसरातील नागरीकांची नियमित रहदारी असते रस्ता रुंद असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या रस्त्याकरीता रु.१.०० कोटीचा निधी मंजुर आहे.

करीता, वॉर्ड क्र.२०, जयभिमनगर अंतर्गत टी.बी.हॉस्पीटल ते आरेफ कॉलनी फोर्टवाल पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाश्मी
**अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२०, जयभिमनगर अंतर्गत टी.बी.हॉस्पीटल ते आरेफ कॉलनी फोर्टवाल पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाकरीता मंजुर असलेल्या रु.१.०० कोटीचा निधीतून कामे करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२५ अंतर्गत मोहल्ला व्ही.आय.पी.रोड लगत रशीदपुरा, गणेश कॉलनी व हिनानगर, शताब्दीनगरकडे जाणाऱ्या मार्ग चौराहास शहरातील जेष्ठ समाजसेवक कै.मोहम्मद हुसेन बाबा मस्तान यांच्या नावाने “बाबा मस्तान चौक” असे नामकरण करणे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन **अनुमोदक:-**श्रीमती सरीता अरुण बोर्डे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२५ अंतर्गत मोहल्ला व्ही.आय.पी.रोड लगत रशीदपुरा, गणेश कॉलनी व हिनानगर, शताब्दीनगरकडे जाणाऱ्या मार्ग चौराहास शहरातील जेष्ठ समाजसेवक कै.मोहम्मद हुसेन बाबा मस्तान यांच्या नावाने “बाबा मस्तान चौक” असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.प्रमोद राठोड :सभेला आयुक्त उपस्थित नाहीत. त्यांच्या जागेवर त्यांनी श्री.मोरे यांना अधिकृत केलेले आहे का? तसे पत्र दाखवावे.

मा.महापौर :मी पीठासीन अधिकारी आहे. मी या संदर्भात त्यांना आदेश दिलेले आहे. त्यानुसार ते आयुक्त म्हणुन बसलेले आहेत.

**विषय क्रमांक १२२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सौ.स्वाती पांडुरंग घोडतुरे, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, नानेगाव ता.बदनापुर, जि.जालना या जिल्हा परिषदेच्या शाळेवर सह-शिक्षिका म्हणून सद्यस्थितीमध्ये कार्यरत असून त्यांच्या मुलीस कर्करोग झाला आहे. तसेच त्यांचे सासु/सासरे वृध्द झालेले असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला असून या सर्वांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी त्यांच्या शिवाय दुसरे कोणीही नसुन त्यांचे पतीही बाहेरगावी नोकरी करत आहे. त्यामुळे त्यांचा मुलांचा व सासु-सासऱ्यांचा सांभाळ करण्यासाठी त्यांची बदली मुळगाव औरंगाबाद येथे आंतरजिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी श्रीमती स्वाती पांडुरंग घोडतुरे यांना औरंगाबाद महानगरपालिकेत सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहेत.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शितल विरभद्र गादगे **अनुमोदक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सौ.स्वाती पांडुरंग घोडतुरे, सहशिक्षिका, प्राथमिक शाळा, नानेगाव ता.बदनापुर, जि.जालना या जिल्हा परिषदेच्या शाळेवर सह-शिक्षिका या पदावर कार्यरत असून त्यांची बदली औरंगाबाद येथे आंतरजिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-३, एन-४ सिडको भागातील स्थानिक नागरीकांना टेनिस खेळ खेळण्यासाठी आपल्या महानगरपालिकेचे एन-३ सिडको येथील टेनिस कोर्ट उपलब्ध आहे. तेथे योग्य नियोजन अभावी देखभाल दुरुस्तीची कामे वेळेवर होत नसल्यामुळे स्थानिक नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक तक्रारी आहेत. एन-३, लॉन टेनिस असोसिएशन, औरंगाबाद या संस्थे मार्फत मागील १५ वर्षापासून शहरातील नागरीकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अविरत कार्यरत आहे. या संस्थेमार्फत विविध टेनिस स्पर्धा आयोजित करून टेनिस या खेळा विषयी शहरातील सर्व वयोगटातील खेळाडुंना संधी, योग्यते मार्गदर्शन व प्रशिक्षण नियमित देण्यात येते. संबंधीत संस्थेस त्यांच्या कामाला अधिक प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिकेचे सिडको, एन-३, टेनिस कोर्ट ३० वर्षाच्या कालावधीसाठी न्युनतम भाडे आकारून नियमानुसार भाडेतत्वावर देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-३, लॉन टेनिस असोसिएशन, औरंगाबाद या संस्थेमार्फत विविध टेनिस स्पर्धा आयोजित करून टेनिस या खेळा विषयी शहरातील सर्व वयोगटातील खेळाडुंना संधी, योग्य ते मार्गदर्शन व प्रशिक्षण नियमित देण्यात येते. या संस्थेस त्यांच्या कामाला अधिक प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिकेचे सिडको, एन-३, टेनिस कोर्ट ३० वर्षाच्या कालावधीसाठी न्युनतम भाडे आकारून नियमानुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध मोबाईल टॉवर अनाधिकृत उभारणी व संबंधीत टॉवरला कर न लावल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडत आहे. पुणे महानगरपालिका व कोल्हापूर महानगरपालिका यांचे हद्दीतील मोबाईल टॉवर उभारणी, त्यांचे नियमितीकरण करणे तसेच कर आकारणी करून कर गोळा करणे या कामी या दोन्ही महानगरपालिकांनी एक खिडकी योजने अंतर्गत त्रयस्थ संस्थेची नेमणुक केलेली आहे.

तांत्रिक व न्यायालयीन बाबींमुळे मोबाईल टॉवर परवाना देणे तसेच नियमित करणे व कर आकारणी करून कर गोळा करणे औरंगाबाद महानगरपालिकेस अवघड होत आहे. तसेच सदर कामी मोबाईल टॉवर व त्याच्या संलग्न यंत्रणेचा आणि सर्व तांत्रिक बाबींचा पूर्ण अभ्यास असणे आवश्यक असुन संबंधीत टॉवर कंपन्याच्या अधिकाऱ्यांशी सतत संपर्क करणे गरजेचे आहे. या बाबत त्रुटी असल्याने सदर मोबाईल टॉवरची माहिती कर विभागास उपलब्ध होत नाही. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

तरी, पुणे व कोल्हापूर या महानगरपालिकेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर नियमित करणे व कर आकारणी करून कर गोळा करणेसाठी त्रयस्थ संस्थेची नियमानुसार नेमणुक करता येते का? येत असेल तर औरंगाबाद महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ होईल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे **अनुमोदक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुणे व कोल्हापूर या महानगरपालिकेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर नियमित करणे व कर आकारणी करून कर गोळा करणेसाठी त्रयस्थ संस्थेची नियमानुसार नेमणुक करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४ अंतर्गत येणाऱ्या वॉर्डात व आजूबाजूच्या किमान ३ वॉर्डात फार मोठ्या प्रमाणात वीटभट्टी कामगार तसेच विविध स्वरुपाचे कामगार वर्ग राहतात. तसेच आजूबाजूच्या लगतच्या असलेल्या वॉर्डात फार मोठ्या प्रमाणात दलित समाज, अल्पसंख्यांक समाज व इतर ओबीसी समाज, कोळी समाज राहतो. या भागामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात कामगार वर्ग महिला वर्ग तसेच लहान मुले १८ वर्षाखालील युवक राहत असल्यामुळे या सर्वांना चांगले दर्जेदार शिक्षण देणे, तसेच तांत्रिक प्रशिक्षण देणे व केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाचे विविध उपक्रम राबविण्यासाठी भारताचे लोकप्रिय पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या विचाराने “सबका साथ सबका विकास” या संकल्पनेतून काम करण्याची नितांत गरज असल्याचे दिसते. यासाठी या भागामध्ये जनता विकास शैक्षणिक व सामाजिक सेवाभावी संस्था औरंगाबाद ही संस्था अंगणवाडी, बालवाडी वर्ग सुरु करणे तसेच प्राथमिक शाळा सुरु करणे, महिला वर्गाला स्वयंपुर्ण करण्यासाठी विविध तांत्रिक कोर्सेस सुरु करणे, विविध विकास कौशल्य कार्यक्रम राबविणे, लहान लहान उद्योग विषयी प्रशिक्षण केंद्र चालविणे, वाचनालय चालविणे, तसेच केंद्र व राज्य शासनाचे विविध कल्याणकारी योजना शासनामार्फत राबविणे इत्यादी सामाजिक उपक्रम संपुर्णत: मोफत राबवू इच्छिते, त्यामुळे किमान येथील ४ ते ५ वॉर्डाच्या रहिवासीयांना याचा फायदा होईल व महानगरपालिकेची आर्थिक बचत सुध्दा होईल. तरी वॉर्ड क्र.४ च्या अंतर्गत येणाऱ्या जटवाडा रोड येथील स्मृतीवन उद्यानाच्या बाहेर दक्षिण बाजुला जटवाडा रोडला लागून असलेली महानगरपालिकेची पडीत जागा ज्याचा कोणत्याही प्रकारे वापर होत नाही ज्यात एकूण

पडीत जमिनी पैकी फक्त ५ गुंठे पडीत जागा नाममात्र शुल्कामध्ये ही जागा जनता विकास शैक्षणिक व सामाजिक सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांना ३० वर्षासाठी नाममात्र भाडेपट्याने देण्यात यावी. जेणे करून महानगरपालिकेला संस्थेतर्फे भाडेपट्टी सुध्दा मिळेल तसेच सामाजिक उपक्रम सुध्दा राबविण्यात येईल व विविध सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक उपक्रम राबविणे इत्यादी शक्य होईल व स्थानिक रहिवासियांना तसेच विटभट्टी कामगार व त्यांची मुले, युवक व महिला वर्ग या सर्वांना याचा लाभ होईल व महानगरपालिकेस सुध्दा संस्थेतर्फे सहकार्य मिळेल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग **अनुमोदक:-** श्री.पुनमचंद सोनाजी बमणे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४ च्या अंतर्गत येणाऱ्या जटवाडा रोड येथील स्मृतीवन उद्यानाच्या बाहेर दक्षिण बाजुला जटवाडा रोडला लागून असलेली महानगरपालिकेची पडीत जागा ज्याचा कोणत्याही प्रकारे वापर होत नाही ज्यात एकूण पडीत जमिनी पैकी फक्त ५ गुंठे पडीत जागा नाममात्र शुल्कामध्ये ही जागा जनता विकास शैक्षणिक व सामाजिक सेवाभावी संस्था औरंगाबाद ही संस्था अंगणवाडी, बालवाडी वर्ग सुरु करणे तसेच प्राथमिक शाळा सुरु करणे, महिला वर्गाला स्वयंपुर्ण करण्यासाठी विविध तांत्रिक कोर्सेस सुरु करणे, विविध कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे, लहान लहान उद्योग विषयी प्रशिक्षण केंद्र चालविणे, वाचनालय चालविणे, तसेच केंद्र व राज्य शासनाचे विविध कल्याणकारी योजना शासनामार्फत राबविणे इत्यादी सामाजिक उपक्रम संपुर्णत: मोफत राबविण्यासाठी या संस्थेस ३० वर्षासाठी नाममात्र भाडेपट्याने नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक ११४ देवळाई सातारा आणि प्रभाग क्रमांक ११५ सातारा परिसर या भागाचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि महानगरपालिकेत या भागांचा समावेश झाल्यानंतर या दोन्ही वार्डाचा विकास होण्याऐवजी या परिसरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नसल्याने या परिसरातील नागरीकांनी दोन्ही वार्ड महानगरपालिकेतून वगळून नगर परिषद करण्यात यावी व त्यासाठी महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे व तसेच शासनास कळवावे अशी मागणी केलेली असल्याने वॉर्ड क्र.११४ व वॉर्ड क्र.११५ महानगरपालिकेतून वगळणे व नगर परिषद करणे आणि तसे शासनास कळविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे, कु.सायली भागवत जमादार

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर :हा विषय प्रशासनामार्फत यावा.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनामार्फत ठेवण्यास मान्यता देण्यात येते.

**विषय क्रमांक १२३४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४ येथे अल्पसंख्यांक लोक राहतात या परिसरामध्ये ड्रेनेज लाईन नसल्यामुळे नागरिकांना अत्यंत त्रास सहन करावा लागत आहे. सदरील परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे गरजेचे आहेत. तसेच वॉर्डामध्ये अनेक वर्षापासून जुने व कच्चे रस्ते असल्यामुळे नागरीकांना वाहन चालवत असतांना त्रास सहन करावा लागत आहे.

करीता, अल्पसंख्यांक निधीमध्ये दोन्ही कामे करण्यात यावे. (१) वॉर्ड क्र.३४, कादरीया कॉलनी व मिसरवाडी येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.२५ लाख (२) वॉर्ड क्र.३४, कादरीया कॉलनी व मिसरवाडी येथे नविन सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, रु.२५ लाख.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४ येथे अल्पसंख्यांक निधीतुन (१) वॉर्ड क्र.३४, कादरीया कॉलनी व मिसरवाडी येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.२५ लाख (२) वॉर्ड क्र.३४, कादरीया कॉलनी व मिसरवाडी येथे नविन सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, रु.२५ लाख. करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**सुचक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

**<u>विषय क्रमांक १२३५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक ११४, देवळाई-सातारा आणि प्रभाग क्रमांक ११५, सातारा या भागाचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापी, महानगरपालिकेत या भागांचा समावेश झाल्यानंतर या दोन्ही वॉर्डाचा विकास होण्याऐवजी या परिसरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसल्याने या परिसरातील नागरीकांना दोन्ही वॉर्ड महानगरपालिकेतून वगळून नगर परिषद करण्यात यावी व त्यासाठी महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे व तसेच शासनास कळवावे अशी मागणी केलेली असल्याने वॉर्ड क्रमांक-११४ व वॉर्ड क्र.११५ महानगरपालिकेतून वगळणे व नगरपरिषद करणे आणि तसे शासनास कळविणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**कु.सायली भागवत जमादार,श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर :हा विषय प्रशासनामार्फत यावा.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनामार्फत ठेवण्यास मान्यता देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक १२३६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ९८, उल्कानगरी अंतर्गत हिरण्यनगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत विकसित करण्यात येत असलेल्या उद्यानास “गुरुहरी काकाजी महाराज ध्यान योग उद्यान” असे नाव देण्याची मागणी प्रभागातील नागरीकांनी केलेली आहे.

नागरिकांनी केलेल्या मागणीचा विचार करुन उल्कानगरी परिसरात विकसित करण्यात येत असलेल्या उद्यानास “गुरुहरी काकाजी महाराज ध्यान योग उद्यान” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ९८, उल्कानगरी अंतर्गत हिरण्यनगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत विकसित करण्यात येत असलेल्या उद्यानास “गुरुहरी काकाजी महाराज ध्यान योग उद्यान” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२३७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चंपाचौक ते जालना रोड हा ३० मीटर डि.पी.रोड विकास योजनेअंतर्गत मंजुर आराखड्यामध्ये ४० वर्षापासुन प्रस्तावित असुन सदर विकास रस्त्यामध्ये ६०० बाधीत मालमत्ता आहे. सद्यस्थितीमधून मनपाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक असल्याकारणाने आपण सदरील मालमत्ता धारकांना मोबदला देवु शकत नसुन या रस्त्यांचा विकास खुंटला आहे. तसेच

तेथील मालमत्ता धारकांना विकास ही करता येत नाही व खरेदी विक्री ही करता येत नसुन नागरीक हे अत्यंत त्रस्त झालेले आहे. या भागामध्ये ७५% पेक्षा जास्त नागरीक आर्थिक दुर्बल घटकातील आहे. तरी सदरील रस्त्याचा जिथपर्यंत विकास झालेला आहे. तेथुन पुढे रस्त्याची आखणी बदलण्यात यावी. सद्यस्थितीत हा रस्ता चंपा चौक ते अजमेरी हॉटेल पर्यंत नागरीकांसाठी खुला आहे. अजमेरी हॅाटेल ते हरी मस्जीद या मार्गे वळवुन जाफरगेट ते जालनारोड या ३० मी.डि.पी रस्त्याला जोडण्यात यावा. कारण सद्यस्थितीमध्ये जालना रोडला पर्यायी रस्ता म्हणुन सिल्लेखाना ते एमजीएम या रस्त्याचे काम प्रगतीपथावर चालू आहे, तसेच या भागात दाट वस्ती असून रस्त्याची आवश्यकता वाटत नसुन यात महापालिकेचे हित असुन यामध्ये महापालिकेचा आर्थिक फायदा होईल व विकास होईल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके,श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चंपाचौक ते जालना रोड हा ३० मीटर डि.पी.रोड विकास योजने अंतर्गत मंजुर आराखड्यामध्ये ४० वर्षापासुन प्रस्तावित असुन सदर विकास रस्त्यामध्ये ६०० बाधीत मालमत्ता आहे. या भागामध्ये ७५% पेक्षा जास्त नागरीक आर्थिक दुर्बल घटकातील आहेत. तरी सदरील रस्त्याचा जिथपर्यंत विकास झालेला आहे तेथुन पुढे रस्त्याची आखणी बदलण्यात येऊन अजमेरी हॅाटेल ते हरी मस्जीद या मार्गे वळवुन जाफरगेट ते जालनारोड या ३० मी.डि.पी रस्त्याला जोडण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२३८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती संध्या अनंतराव राजवाडकर सहशिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मनखेडी (बु) ता.धडगांव, जिल्हा नंदूरबार यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झालेली असून त्यांचे मुळगाव औरंगाबाद आहे. त्यामुळे श्रीमती संध्या अनंतराव राजवाडकर यांनी एकतर्फी आंतरजिल्हा बदली संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्यांना जिल्हा परिषद नंदुरबार यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

तरी, श्रीमती संध्या अनंतराव राजवाडकर, सहशिक्षिका यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेत बदली करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सत्यभामा दामोधर शिंदे **अनुमोदक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती संध्या अनंतराव राजवाडकर सहशिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मनखेडी (बु) ता.धडगांव, जिल्हा नंदूरबार यांची एकतर्फी आंतरजिल्हा बदली अंतर्गत महानगरपालिकेच्या शाळेत बदली करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२३९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये विविध विकासाचे काम झालेले नाही. त्यामुळे नागरीकांना ड्रेनेज लाईन व रस्ते खराब झाल्यामुळे फार त्रास सहन करावा लागत आहेत.

करीता, खालील ड्रेनेज लाईन/रस्ते व पथदिवे लावण्याचे कामे सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर करण्यात यावे जेणे करून नागरीकांचा त्रास सहन करणे कमी होणार आहे.

१) वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये जुनी व खराब ड्रेनेज लाईन बदलणे. र.रु.२५.०० लक्ष.
२) वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये जुनी व खराब सिमेंट कॉंक्रेट रस्ते तयार करणे. र.रु.२५.०० लक्ष.
३) वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये पोलसहित पथदिवे व हायमास्ट दिवे लावणे. र.रु.२०.०० लक्ष.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्री.शेख जफर अख्तर
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथे खालील ड्रेनेज लाईन/रस्ते व पथदिवे लावण्याची कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

१) वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये जुनी व खराब ड्रेनेज लाईन बदलणे. र.रु.२५.०० लक्ष.
२) वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये जुनी व खराब सिमेंट कॉंक्रेट रस्ते तयार करणे. र.रु.२५.०० लक्ष.
३) वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये पोलसहित पथदिवे व हायमास्ट दिवे लावणे. र.रु.२०.०० लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११५, सह्याद्री नगर, सातारा परिसर येथील चौकास “धर्मवीर संभाजी राजे चौक” असे नाव देण्यात यावे. अशी येथील नागरीकांची मागणी असल्यामुळे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री. सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११५, सह्याद्री नगर, सातारा परिसर येथील चौकास “धर्मवीर संभाजी राजे चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११४/११५, देवळाई-सातारा/कांचनवाडी कडे जाणाऱ्या मार्गास (रस्त्यास) “राजे मल्हारराव होळकर” असे नाव देण्यात यावे अशी येथील नागरीकांची मागणी असल्यामुळे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री. सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११४/११५, देवळाई-सातारा/कांचनवाडी कडे जाणाऱ्या मार्गास (रस्त्यास) “राजे मल्हारराव होळकर” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मिटमिटा गट नंबर १०७ आर्च अंगण परिसरामध्ये मनपाकडून अद्यापपर्यंत या भागात पाण्याच्या पाईप लाईन टाकण्यात आलेला नाही. परंतु या भागातील नागरीकांची ऊन्हाळा व इतर दिवसांमध्ये पिण्याच्या व वापरण्याच्या पाण्यासाठी खुप जास्त प्रमाणात त्यांची तारांबळ होत आहे. याबाबत तेथील नागरीकांनी पाण्याची पाईप लाईन टाकणे

बाबत वारंवार मागणी करत असून या दिवसांमध्ये परिसरामध्ये पाण्यामुळे तेथील नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून आर्च अंगण येथील आपल्या मनपाच्या खुल्या जागेत सर्व नागरीक स्वखर्चाने सार्वजनिक विहीर करू इच्छीत असुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मिटमिटा गट नंबर १०७ आर्च अंगण परिसरामध्ये मनपाच्या खुल्या जागेत सर्व नागरीक स्वखर्चाने सार्वजनिक विहीर करू इच्छीत असून यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव मध्ये पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन नसल्यामुळे पाण्यासाठी नागरीकांना भटकावे लागत आहे. करीता, वॉर्डामध्ये नविन विहीर करणे अत्यंत गरजेचे आहेत व वॉर्डामध्ये बहुतेक ठिकाणी अंधार असल्यामुळे नागरीकांना फार त्रास सहन करावा लागत आहेत.

१) वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कासंबरी दर्गा जवळील विहीरीचे खोदकाम दुरुस्ती व इतर कामे करणे, रु.२० लक्ष.
२) वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत आर्च अंगण येथे सार्वजनिक विहीर करणे, रु.२० लक्ष.
३) वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी पोलसहित विद्युत दिवे व हायमास्ट लावणे. रु.१५ लक्ष.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथे खालीलप्रमाणे कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

१) वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कासंबरी दर्गा जवळील विहीरीचे खोदकाम दुरुस्ती व इतर कामे करणे, रु.२० लक्ष.
२) वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत आर्च अंगण येथे सार्वजनिक विहीर करणे, रु.२० लक्ष.
३) वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी पोलसहित विद्युत दिवे व हायमास्ट लावणे. रु.१५ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यावेळी काही सदस्य डायस वरील राजदंड उचलतात.

मा.महापौर :शहरे “हागणदारी मुक्त” करणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत “स्वच्छ” करणे तसेच स.स.श्रीमती मोरे, श्री.शेजवळ, श्री.नाईकवाडी यांचे विषय आहेत यासह ऐनवेळीचे प्रशासनाचे, सदस्यांचे व इतर सर्व विषय मंजुर करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक १२४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संपुर्ण भारत देश ऑक्टोंबर २०१८ पर्यंत स्वच्छ करण्याच्या उद्देशाने दि.०२ ऑक्टोंबर २०१४ पासून “स्वच्छ भारत अभियान” देश भरात राबविण्यात येत आहे.

त्याच धर्तीवर “स्वच्छ महाराष्ट्र अभियान” (नागरी) ची अंमलबजावणी दि.१५ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपुर्ण “मिशन मोड” पध्दतीने सुरु आहे. या अभियांनातर्गत शहरे “हागणदारी मुक्त” करणे व घनकचरा व्यवस्थाना अंतर्गत “स्वच्छ” करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी करून राज्याचा नागरी भाग दि.०१ ऑक्टोंबर २०१७ “हागणदारी मुक्त” घोषित करण्यात आले आहे. आता या अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे “शहर स्वच्छ” करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, नागरी भागात व सार्वजनिक ठिकाणी काही प्रमाणात होत असलेल्या अस्वच्छतेमुळे नागरीकांकडून प्रतिकुल प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसून येतात.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारत घेता, शहरांना कचरा मुक्त होण्याकरीता एकूणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्यास्तव शहरांना तारांकीत मानांकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (A protocol for making cities Garbage Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आल्यानुसार ODF+ घोषित करणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील एक घटक म्हणुन व स्वच्छ सर्वेक्षण २०१९ करीता अनिवार्य आहे. यावरती शासनाकडून येणारे अनुदान अवलंबुन आहे. त्याच प्रकारे स्वच्छ अभियान (नागरी) अंतर्गत कचरा विलगीकरणाची कार्यवाही न करणाऱ्या व स्वच्छ सर्वेक्षण मध्ये योग्य कामगिरी न करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राधान्याने देण्यात येणारी अनुदाने थांबविण्याबाबत नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१८/प्र.क्र.७९/नवि-३४ दिनांक २९ जानेवारी २०१८ द्वारे कळविलेले आहे.

त्यानुषंगाने औरंगाबाद शहरात स्वच्छ अभियानाची सुरुवात दि.०१ ऑक्टोंबर २०१७ पासून झाली आहे. दि.३१ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्र व पर्यायाने औरंगाबाद शहर हागणदारी मुक्त म्हणुन घोषित करण्यात आला असून दि.२०.०५.२०१७ रोजी मा.सर्वसाधारण सभेने याबाबत मान्यता दिलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका शहर “हागणदारी मुक्त” (ODF+) साठी मानांकन व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहर स्वच्छतेबाबत पाच तारांकन (5-Star) तसेच शहरांना तारांकीत मानांकन च्या नियमावली नुसार दि.०१.१०.२०१८ रोजी महानगरपालिकेमार्फत शहरातील निवडणुक वॉर्डामध्ये “स्वच्छ वॉर्ड स्पर्धा” घेण्यात आली व यामध्ये ११५ वॉर्डापैकी ६५ वॉर्ड “स्वच्छ वॉर्ड” म्हणुन घोषित करण्यात आले असून दि.२०.१०.२०१८ रोजी मा.सर्वसाधारण सभेने या बाबत मान्यता देऊन ठराव पारीत केला आहे.

केंद्र शासन व राज्य शासनाने शहर “हागणदारी मुक्त” (ODF++) करण्यासाठी शहरामध्ये १०० टक्के वैयक्तिक शौचालय असणे, सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्र करणे, आवश्यकतेनुसार सार्वजनिक शौचालय असणे बाबत सुचना केलेली आहे. त्यानुषंगाने औरंगाबाद शहरामध्ये आजपावेतो वैयक्तिक शौचालय बांधण्याचे काम १०० टक्के पुर्ण झालेले आहे. शहरामध्ये सांडपाण्याचे व्यवस्थित नियोजन करून सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात आहे. तसेच शहरामध्ये ५० सार्वजनिक शौचालय बांधण्यात आले आहे.

केंद्र शासन व राज्य शासनाने उपरोक्तप्रमाणे दिलेल्या सुचनांप्रमाणे औरंगाबाद शहर “हागणदारी मुक्त” (ODF++) साठी पात्र झाले आहे व घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत शहर स्वच्छतेबाबत ५ तारांकन (5 Star) निश्चित केले असून याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ/मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासन व राज्य शासनाने उपरोक्तप्रमाणे दिलेल्या सुचनांप्रमाणे औरंगाबाद शहर "हागणदारी मुक्त" (ODF++) साठी पात्र झालेले असून घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत शहर स्वच्छतेबाबत ५ तारांकन (5 Star) निश्चित केले असून याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१) प.पू.राष्ट्रसंत राजाराम महाराज (कैकाडी महाराज) यांनी राज्यभर जी समाज सुधारणा केली, स्वच्छता अभियान राबविले, प्रबोधनात्मक किर्तने करून सामाजीक व राष्ट्रीय कार्यात विशाल व अफाट योगदान दिले. अशा प.पू.राष्ट्रसंत राजाराम महाराज (कैकाडी महाराज) यांचा भव्य पुतळा क्रांतीचौक ते पैठणगेट नुतन कॉलनी चौकात उभारण्यात यावा व या चौकाचे नामकरण "प.पू.राष्ट्रसंत राजाराम महाराज (कैकाडी महाराज)" असे करण्यात यावे.

२) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या थोर मातेचे सर्वच क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन चिकलठाणा येथील शासकीय रुग्णालयास "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांचे नाव देण्यात यावे.

**सुचक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प.पू.राष्ट्रसंत राजाराम महाराज (कैकाडी महाराज) यांचा भव्य पुतळा क्रांतीचौक ते पैठणगेट नुतन कॉलनी चौकात उभारण्यास आणि या चौकाचे नामकरण "प.पू.राष्ट्रसंत राजाराम महाराज (कैकाडी महाराज)" असे करण्यास तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या थोर मातेचे चिकलठाणा येथील शासकीय रुग्णालयास "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-११, हडको, मयुरनगर येथे खुल्या जागेमध्ये मागील दहा वर्षापासून भाजीमंडी भरत आहे. या वॉर्डाची मा.महापौर महोदयांनी मागील महिन्यात पाहणी केलेली आहे. तसेच दिनांक १७.१२.२०१९ रोजी मा.आयुक्त साहेबांनी पाहणी केलेली आहे. या मंडईमध्ये सिडको-हडको परिसरातील नागरिक भाजीपाला खरेदीसाठी येत असतात. या भागामध्ये नागरिकांसाठी भाजीमंडीची आवश्यकता आहे. त्यामुळे या ठिकाणाची भाजीमंडी ही नियमानुसार नियमित करण्यात यावी. या ठिकाणी भाजीपाला विक्री करणाऱ्यांकडून योग्य ते भाडे आकारून भाजीमंडी नियमित केल्यास महानगरपालिकेचे उत्पन्न देखील वाढेल. या ठिकाणी व्यवसाय करणारे २०० ते २५० भाजी विक्रेते यांचा रोजगाराचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. सध्या ज्या ठिकाणी भाजीमंडी भरते ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची असून नियमाप्रमाणे सदरील भाजीमंडी नियमित करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-११, हडको, मयुरनगर येथे खुल्या जागेमध्ये जी भाजीमंडी भरते ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची असून त्या ठिकाणी असणारी भाजीमंडी नियमाप्रमाणे नियमित करण्यास व संबंधीत भाजीपाला विक्रेत्याकडून योग्य ते भाडे आकारून कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-९९, जयविश्वभारती कॉलनी परिसरातील मौजे शहानूरवाडी, सर्वे नं.९/२ तापडीयानगरच्या दक्षिणेकडील महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेतील ऑक्सीजन झोनला माजी पंतप्रधान “स्व.भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी ऑक्सीजन झोन” असे नाव देण्याची व या ठिकाणी त्यांनी लिहीलेल्या कवितांची व विचारांची माहिती महानगरपालिकेच्या काव्य उद्यानाप्रमाणे लिहिण्यात यावी. अशी मागणी प्रभागातील नागरीकांनी केलेली आहे.

नागरिकांनी केलेल्या मागणीचा विचार करून जय विश्वभारती परिसरातील शहानूरवाडी सर्वे नं.९/२, तापडीयानगरच्या दक्षिणेकडील महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेतील ऑक्सीजन झोनला माजी “स्व.भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी ऑक्सीजन झोन” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-**श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-९९, जयविश्वभारती कॉलनी परिसरातील मौजे शहानूरवाडी, सर्वे नं.९/२ तापडीयानगरच्या दक्षिणेकडील महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेतील ऑक्सीजन झोनला माजी पंतप्रधान “स्व.भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी ऑक्सीजन झोन” असे नाव देण्यास तसेच त्यांनी लिहीलेल्या कवितांची व विचारांची माहिती महानगरपालिकेच्या काव्य उद्यानाप्रमाणे या ही ठिकाणी लिहिण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ अंतर्गत मोठ्या प्रमाणात दलित वस्ती असून अनेक वर्षापासून हा भाग मुलभूत सुविधांपासून वंचित आहे. या भागांतर्गत असलेल्या स्लम वस्त्या, गावठाण, गिरीजानगर, उत्तमनगर, माजी सैनिक कॉलनी, शिवपूरी कॉलनी, पडेगाव, सावित्रीबाई फुले नगर, गणेशनगर, गीतानगर, कोयनानगर या सर्व वसाहतीमध्ये अनेक विविध समस्या असून बऱ्याच वर्षापासून पिण्याची पाण्याची पाईप लाईन, सिमेंट कॉँक्रीट रस्ते, ड्रेनेज लाईन, दिवा बत्ती, नाल्याच्या संरक्षण भिंती, स्मशान भुमी, आर.सी.सी.शेड, सामाजिक सभागृह उभारणे गरजेचे असून वरील सर्व सुविधांपासून पडेगाव या भागातील नागरीक वंचित असून वॉर्डातील नागरीकांची विनंती आहे की, सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पामध्ये लोक शाहीर अण्णा भाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव विविध वसाहतीमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत हिंदुराष्ट्र चौक ते विजय नगर चौक पर्यंत १५० मी.मी. व्यासाची डि.आय.के.७ जलवाहिनी टाकणे बाबत हे काम कंत्राटदार श्री.सुरेश बी.साधवानी यांनी हिंदुराष्ट्र चौक ते बाळकृष्ण नगर अंतर्गत पूर्वी टाकण्यात आलेल्या १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ या लाईनला जोडण्यात आली आहे. पुढे नाला क्रॉस करावा लागत आहे. तसेच ज्या बाजुने पाण्याची लाईन टाकावयाची आहे त्या बाजुने सध्या ड्रेनेज लाईन कार्यरत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचे आहे. करीता या कामामधून शिल्लक राहिलेले १५० मी.मी. व्यासाची डि.आय.के.७ पाईप आदर्श कॉलनी या भागात टाकण्यात यावेत. कारण त्या भागात मनपा सध्या दोन तास पाणीपुरवठा करते नागरिकांना दाबाने पाणीपुरवठा होत नाही. म्हणून तेथील नागरीकांनी मा.महापौर, मा.आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे पाण्याच्या दाब वाढवण्यात यावा म्हणून खुप वेळेस निवेदने दिलेली आहेत.

करीता, शिल्लक राहिलेल्या कामाचे स्थळ बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मोरे ज्योती राजाराम **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत हिंदुराष्ट्र चौक ते विजय नगर चौक पर्यंत १५० मी.मी. व्यासाची डि.आय.के.७ जलवाहिनी टाकणे बाबत हे काम कंत्राटदार श्री.सुरेश बी.साधवानी यांनी हिंदुराष्ट्र चौक ते बाळकृष्ण नगर अंतर्गत पूर्वी टाकण्यात आलेल्या १०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.७ या लाईनला जोडण्यात आली असुन या कामामधून शिल्लक राहिलेले १५० मी.मी. व्यासाची डि.आय.के.७ पाईप आदर्श कॉलनी या भागात टाकण्यास आणि शिल्लक राहिलेल्या कामाचे स्थळ बदलण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८८ मधील मुख्य रस्ता पुष्पक गार्डन ते बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत आहे. नागरिकांची मागणी आहे की, त्या रस्त्याला अजहर मामु नाव देण्यात यावे. अजहर मामु चिकलठाणा मधील जेष्ठ नागरिक होते. सर्व समाजांना सोबत घेऊन चालणारे होते. सर्व चिकलठाणा नागरिकांची मागणी आहे की, या रस्त्याला "अजहर मामु" नाव हे फलक द्यावे.

करीता, नागरीकांची मागणी लक्षात घेता सदरील रस्त्याला अजहर मामु या नावाचा फलक महानगरपालिकेतर्फे लावण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सोहेल शकील शेख **अनुमोदक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८८ मधील मुख्य रस्ता पुष्पक गार्डन ते बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंतच्या रस्त्याला "अजहर मामु" असे नाव देण्यास व तसा फलक लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भिमनगर, भावसिंगपुरा (दक्षिण) येथील विविध ठिकाणी विकास कामे झालेली नसल्यामुळे नागरिकांना रस्ते व ड्रेनेज लाईन खराब झाल्यामुळे फार त्रास सहन करावा लागत आहे. करीता, वॉर्डातील विविध विकास कामे करणे गरजेचे असून सदरील विकास कामांना मंजुरी देण्यात येऊन नविन अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावा. जेणे करून नागरीकांच्या समस्या सुटतील.

**विकास कामांची यादी खालील प्रमाणे.**

१) भावसिंगपुरा मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष
२) अजिंठा हौ.सोसायटी येथे रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष
३) राजे संभाजी चौक ते आमेन चौक पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष
४) गीता नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. रु.२० लक्ष
५) भावसिंगपुरा-भिमनगर येथे मुख्य प्रवेशद्वार बनविणे. रु.२० लक्ष
६) भावसिंगपुरा-भिमनगर येथे विविध विकास कामे करणे. रु.२५ लक्ष

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भिमनगर, भावसिंगपुरा (दक्षिण) येथील विविध ठिकाणी विकास कामांना मंजुरी देण्यात येते.

**विकास कामांची यादी खालील प्रमाणे.**

१) भावसिंगपुरा मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष
२) अजिंठा हौ.सोसायटी येथे रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष
३) राजे संभाजी चौक ते आमेन चौक पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष
४) गीता नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. रु.२० लक्ष
५) भावसिंगपुरा-भिमनगर येथे मुख्य प्रवेशद्वार बनविणे. रु.२० लक्ष
६) भावसिंगपुरा-भिमनगर येथे विविध विकास कामे करणे. रु.२५ लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेस विकासकाकडून मिळालेल्या ७५%, २५% आरक्षणातून तापडिया न.भु.क्र.१६०३१/४, १६०३०/पी तापडीया इमारत श्रेयनगर या इमारतीमध्ये एकुण तीन मजल्यातील एकुण २५% इमारतीचा हिस्सा ज्याचे क्षेत्रफळ ५७६.३१ चौ.मी. ऐवढे असून सदर इमारत महानगरपालिकेकडे हस्तांतर झाली तेव्हापासून विना वापर पडून असल्याने महानगरपालिकेस सदर इमारतीपासून कोणतेही उत्पन्न मिळालेले नाही.

करीता, सदर इमारत श्रध्दापुजा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.,क्रांतीनगर, औरंगाबाद या संस्थेस भाडेतत्वावर दिल्यास त्यापासून महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल व इमारतीची देखभाल दुरुस्ती संस्थेने करणेसाठीच्या अटीस अधीन राहून उक्त प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन **अनुमोदक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेस विकासकाकडून मिळालेल्या ७५%, २५% आरक्षणातून तापडिया न.भु.क्र.१६०३१/४, १६०३०/पी तापडीया इमारत श्रेयनगर ही इमारत श्रध्दापुजा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म., क्रांतीनगर, औरंगाबाद या संस्थेस भाडेतत्वावर दिल्यास त्यापासून महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल व इमारतीची देखभाल दुरुस्ती संस्थेने करणेसाठीच्या अटीस अधीन राहून नियमानुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या औरंगाबाद शहरात डेंगु हा आजार सगळीकडे पसरत आहे. श्री.शेख सैफउल्ला शेख सलीमउल्ला रा.गणेश कॉलनी, रशीदपुरा, औरंगाबाद यांची दिनांक १२.११.२०१९ रोजी डेंग्यु या आजारामुळे मृत्यु झाला आहे. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची व बिकट असून त्यांच्या घरातील प्रमुख उदरनिर्वाह करणारे श्री.शेख सैफउल्ला शेख सलीमउल्ला हेच होते. सध्या त्यांच्या परिवारावर उपासमरीची वेळ आली आहे. त्यामुळे मनपातर्फे त्यांना तात्काळ १५ लक्ष रुपये आर्थिक मदत देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणेश कॉलनी, रशीदपुरा, औरंगाबाद येथील रहिवासी श्री.शेख सैफउल्ला शेख सलीमउल्ला यांचा दिनांक १२.११.२०१९ रोजी डेंग्यु आजारामुळे मृत्यु झाला आहे. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची व बिकट असल्याने मनपातर्फे त्यांच्या कुटूंबीयांना रु.१५ लक्ष आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ची गतीमानरित्या व प्रभावीपणे अंमलबजावणी होणेस व लाभार्थ्यांना विहीत मुदतीत प्रत्यक्षात भौतिक लाभ मिळणेसाठी या विशिष्ट योजनेच्या कामकाजावर स्वतंत्र तांत्रिक विभागप्रमुख तथा कार्यकारी अभियंता असणे अत्यंत गरजेचे आहे. सद्यस्थितीत सदर योजनेच्या प्रमुखपदी स्वतंत्र तांत्रिक अधिकारी नसल्यामुळे अर्जदारांची व लाभार्थ्यांची हेळसांड होत असून विविध वॉर्डातून तक्रारींचा ओघ आहे.

सदर योजनेचे तांत्रिक विभागप्रमुख तथा कार्यकारी अभियंता म्हणून काम पाहणारे उपअभियंता संवर्गातील अनुभवी व ज्येष्ठ स्थापत्य अभियंता श्री.शेख खमर अ.शकूर हे दिनांक ३०.०६.२०१९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांच्या कार्यकाळात योजनेच्या व शासकीय अनुदानातील कामांना चालना मिळाली होती.

महानगरपालिकेतील बरेच वरिष्ठ अधिकारी/अभियंते या दोन वर्षात सेवानिवृत्त झालेले आहेत आणि काहींनी स्वेच्छानिवृत्ती घेतलेली असल्यामुळे सद्यस्थितीत या विशिष्ट आणि शासकीय अनुदान योजनेच्या कामासाठी स्वतंत्र तांत्रिक विभागप्रमुख उपलब्ध नसल्यामुळे श्री.शेख खमर, सेवानिवृत्त अभियंता जे की, उच्चशिक्षित व अनुभवी आहेत, ते मास्टर ऑफ इंजिनिअरिंग असुन त्यांनी विधी शाखेतील पदवी देखील प्राप्त केलेली आहे. त्यांना तांत्रिक विभाग प्रमुख/कार्यकारी अभियंता पदावर

दोन वर्षांसाठी विशेष बाब म्हणून नियुक्ती दिल्यास योजनेच्या व शासकीय अनुदानाच्या कामास गती प्राप्त होईल. परिणामी योजनेचे उद्दिष्ट देखील विहित मुदतीत सफल होईल.

शासन सेवेतील काही अधिकाऱ्यास त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर देखील विशिष्ट योजनेच्या कामासाठी शासनाने विशेष बाब म्हणून दोन वर्षांसाठी नियुक्ती दिलेली आहे. ही बाब विचारात घेता श्री.शेख खमर, सेवानिवृत्त अभियंता यांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)/शासकीय अनुदानातील योजनेसाठी तांत्रिक विभाग प्रमुख/कार्यकारी अभियंता या पदावर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पुढील दोन वर्षांसाठी विशेष बाब म्हणून नियुक्ती देणेस व सेवानिवृत्तीपूर्वी शेवटच्या महिन्यात त्यांना मिळत असलेले वेतन, भत्ते व इतर सोयी-सुविधा ह्या पुढील दोन वर्षाच्या नियुक्तीच्या कार्यकाळात त्यांना देण्यास शासन मान्यतेच्या अधीन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

**अनुमोदक:-**श्री.राजु रामराव शिंदे, श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव, श्रीमती संगीता सुभाष वाघुले

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या विशिष्ट योजनेची प्रभावीपणे व गतीमान अंमलबजावणी होण्यासाठी आणि लाभार्थ्यांना विहीत मुदतीत भौतिक लाभ मिळण्यासाठी तसेच शासकीय अनुदानातील कामांसाठी महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अभियंता श्री.शेख खमर यांना तांत्रिक विभाग प्रमुख तथा कार्यकारी अभियंता या पदावर त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून पुढील दोन वर्षासाठी विशेष बाब म्हणुन नियुक्ती देण्यास मंजुरी देण्यात येते. सेवानिवृत्तीपुर्वी शेवटच्या महिन्यात त्यांना देण्यात आलेले वेतन व भत्ते व इतर सोई-सुविधा ह्या त्यांच्या नियुक्तीच्या पुढील दोन वर्षाच्या कार्यकाळात त्यांना प्रतिमाह देण्यास मंजुरी देण्यात येते. ठरावाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२५५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दी करीता सन-१९९१ मध्ये विकास योजना (वाढीव हद्द) लागू करण्यात आलेली आहे. सदर विकास योजना सुधारित करण्याचे काम सुरु असून त्या अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्यात आली होती. मात्र प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर या कार्यवाहीस मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे आव्हान देण्यात आले असता, मा.उच्च न्यायालय यांनी ही कार्यवाही रद्दबातल ठरविली आहे. या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

औरंगाबाद शहरासाठी सन-१९९१ मध्ये मंजुर करण्यात आलेल्या विकास योजने (वा.ह.) मध्ये Green Zone या वापराकरीता आरक्षित असलेले क्षेत्रावर शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करणेच्या हेतुने शासन स्तरावर मंजुरी झालेल्या लाभार्थीना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ च्या अनुषंगाने व विकास नियंत्रण नियमावलीतील जोखीम आधारित (Risk based) इमारत परवानगी वास्तुविशारद/इंजिनिअर यांच्यामार्फत प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.

अशा प्रस्तावावर प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल योजनेअंतर्गत ज्या अर्जदारांनी/ लाभार्थीनी प्रस्ताव सादर आहेत. केवळ त्यांच्या क्षेत्रमर्यादेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त बदल हा मंजुर विकास योजनेतील Green Zone या आरक्षित क्षेत्राकरीता असून प्रारुप विकास योजना संदर्भाने मा.न्यायालयाचा जो काही निकाल येईल त्यास अधिन राहून आवश्यक ते बदल करणे आवश्यक राहील.

उपरोक्त बाबींचा विचार करून अर्जदारांनी/लाभार्थ्यांनी सादर केलेल्या क्षेत्र मर्यादेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीस्तव शासनास सादर करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय दुरुस्तीसह मंजुर.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दी करीता सन-१९९१ मध्ये विकास योजना (वाढीव हद्द) लागू करण्यात आलेली आहे. सदर विकास योजना सुधारित करण्याचे काम सुरु असून त्या अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्यात आली होती. मात्र प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर या कार्यवाहीस मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे आव्हान देण्यात आले असता, मा.उच्च न्यायालय यांनी ही कार्यवाही रद्दबातल ठरविली आहे. या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

औरंगाबाद शहरासाठी सन-१९९१ मध्ये मंजुर करण्यात आलेल्या विकास योजने (वा.ह.) मध्ये Green Zone या वापराकरीता आरक्षित असलेले क्षेत्रावर शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करणेच्या हेतुने शासन स्तरावर मंजुरी झालेल्या लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ च्या अनुषंगाने व विकास नियंत्रण नियमावलीतील जोखीम आधारित (Risk based) इमारत परवानगी वास्तुविशारद/इंजिनिअर यांच्यामार्फत प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.

अशा प्रस्तावावर प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल योजनेअंतर्गत ज्या अर्जदारांनी/ लाभार्थींनी प्रस्ताव सादर आहेत. केवळ त्यांच्या क्षेत्रमर्यादेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त बदल हा मंजुर विकास योजनेतील Green Zone या आरक्षित क्षेत्राकरीता असून प्रारुप विकास योजना संदर्भाने मा.न्यायालयाचा जो काही निकाल येईल त्यास अधिन राहून आवश्यक ते बदल करणे आवश्यक राहील.

उपरोक्त बाबींचा विचार करून अर्जदारांनी/लाभार्थ्यांनी सादर केलेल्या क्षेत्र मर्यादेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार गौण फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीस्तव शासनास सादर करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२५६:-</u>** **दि.१८.०७.२०१९ (का.प.क्र.३३) रोजीच्या सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत विकास झाला आहे. असा अनाधिकृत विकास नियमित करण्यासाठी शासनाने वेळोवेळी वेगवेगळ्या योजना आखल्या होत्या उदा.गुंठेवारी नियमितीकरण, प्रशमित संरचना नियमितीकरण इ. मात्र औरंगाबाद शहरात या योजनांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत नागरीकांशी चर्चा केली असता, प्रामुख्याने अशा नियमितीकरणानंतर त्यांच्या भुखंडाच्या मालकी हक्का बद्दल कोणतेही

ठोस प्रमाणपत्र त्यांना मिळत नाही. अशी अडचण समोर येते. असा विकास होतांना प्रथम अनाधिकृत पोटविभाजन होते. त्यानंतर हे पोठविभाजन अनाधिकृत असल्याने त्यावर बांधकाम ही तसेच होते. असा विकास नियमित करतांना जर नागरीकांना पी.आर.कार्ड तयार करून मिळाले तर त्यांना त्यांच्या भूखंडाच्या मालकी बद्दल तसेच त्याचे क्षेत्र, चर्तु:सिमा इत्यादी बाबत निश्चिती होईल व महानगरपालिकेसही नियमितीकरणास चांगला प्रतिसाद मिळेल. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे महसुल विभागाकडे नियमितीकरणानंतर अशा भूखंडाचे पी.आर.कार्ड तयार करणेबाबत अधिकृतपणे प्रस्ताव देण्यात यावा.

सिडको भागात सिडकोने संपुर्ण क्षेत्राचे अधिकृतपणे पोटविभाजन करून भूखंडाचे क्षेत्र, चर्तु:सिमा निश्चित केलेल्या आहेत. मात्र याही क्षेत्राचा नगर भूमापन नकाशा तयार न झाल्याने या भागातील अधिकृत भूखंड धारकांकडे सिडकोशी केलेल्या करारनाम्या व्यतिरिक्त कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. खरे तर या भागात सर्व कार्यवाही पुर्ण झालेली असल्याने नगर भूमापन क्षेत्रात या क्षेत्राचा समावेश होऊन सर्व भूखंड धारकांना पी.आर.कार्ड देणे सहज शक्य आहे. त्यामुळे याही क्षेत्राचे नगर भुमापन सर्व्हेक्षणासाठी अधिकृतपणे प्रस्ताव देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत **अनुमोदक:-**श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

श्री.विकास जैन :मागील सभेतील विषय क्रमांक ११०४ स्थगित होता त्यास मंजुरी देण्यात यावी.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत विकास नियमित करण्यासाठी शासनाने वेळोवेळी उदा.गुंठेवारी नियमितीकरण, प्रशमित संरचना नियमितीकरण इत्यादी प्रामुख्याने अशा नियमितीकरणानंतर त्यांच्या भुखंडाच्या मालकी हक्का बद्दल कोणतेही ठोस प्रमाणपत्र त्यांना मिळत नाही. नागरीकांना पी.आर.कार्ड तयार करून मिळाले तर त्यांना त्यांच्या भूखंडाच्या मालकी बद्दल तसेच त्याचे क्षेत्र, चुर्त:सिमा इत्यादी बाबत निश्चिती होऊन महानगरपालिकेसही नियमितीकरणास चांगला प्रतिसाद मिळेल. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे महसुल विभागाकडे नियमितीकरणानंतर अशा भूखंडाचे पी.आर.कार्ड तयार करणेबाबत अधिकृतपणे प्रस्ताव देण्यात सिडको भागात सिडकोने याही क्षेत्राचा नगर भूमापन नकाशा तयार न झाल्याने या भागातील अधिकृत भूखंड धारकांकडे सिडकोशी केलेल्या करारनाम्या व्यतिरिक्त कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. नगर भूमापन क्षेत्रात या क्षेत्राचा समावेश होऊन सर्व भूखंड धारकांना पी.कार्ड देणे सहज शक्य होईल अशी कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे महसुल विभागाकडे नियमितीकरणानंतर अशा भूखंडाचे पी.आर.कार्ड तयार करणेबाबत अधिकृतपणे प्रस्ताव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२५७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वे नं.३०, जसवंतपुरा, औरंगाबाद पशुवैद्यकीय दवाखान्या मागील खुली जागा ६०X३० क्षेत्रफळ रिकामी जागा पडलेली असून या खुल्या जागेचा उपयोग परिसरातील नागरीक कचरा व घाण टाकण्यासाठी करीत आहेत. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. या खुल्या जागेवर मनपाला कोणत्याही प्रकारचा लाभ व वापर दिसुन येत नाही. तसेच ही खुली जागा भाड्याने घेण्यासाठी “परमवीर अब्दुल हामिद सुशिक्षीत बेरोजगार संस्था” इच्छुक असून ही खुली जागा भाड्याने दिल्यास तेथील नागरीकांच्या सुविधेसाठी विकसीत करण्यात येईल. म्हणुन या संस्थेला प्राधान्य देऊन महानगरपालिकेच्या नियमानुसार व करारनामा करून

भाडेतत्वावर देण्यात यावे. जेणे करून महानगरपालिकेला लाभ व वापर चांगल्या प्रकारे होईल व ही संस्था नागरीकांच्या हितासाठी व सोई-सुविधेसाठी परिश्रम घेत असते. ही खुली जागा भाड्याने दिल्यास नागरीकांच्या हितासाठी आरोग्याच्या देखभालीसाठी वेगवेगळे आरोग्य शिबिरे व विविध कार्यक्रम घेण्यात येईल. तसेच या खुल्या जागेवर कचरा व घाणीमुळे झालेली दुर्गंधी पण नष्ट होईल. सदरील वार्डातील परिसर चांगल्या प्रकारे स्वच्छ राहील.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम शेख **अनुमोदकः-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वे नं.३०, जसवंतपुरा, औरंगाबाद पशुवैद्यकीय दवाखान्या मागील असलेली खुली जागा “परमवीर अब्दुल हामिद सुशिक्षीत बेरोजगार संस्था” या संस्थेस महानगरपालिकेच्या नियमानुसार व करारनामा करून भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. नियमानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १२५८ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी महिला व पुरुषांसाठी पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याचा उपक्रम महानगरपालिकेने हाती घेतला आहे. या उपक्रमा अंतर्गत आतापर्यंत २० पे ॲण्ड युज शौचालय बांधून कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत. याच कार्यक्रमा अंतर्गत शहागंज भागात शहागंज चमन येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांनी कार्यालयीन आदेशाद्वारे सन २०१२-१३ मध्ये या ठिकाणी पे ॲण्ड युज शौचालयाच्या बांधकामास सुरुवात केली होती. या शौचालयाचे आतापर्यंत आर.सी.सी. कॉलम, बीमसह स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. तथापी, या बांधकामास या भागातील नागरीकांनी विरोध केल्याने तसेच या शहागंज चमन मध्ये राष्ट्रपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारण्यात येणार असल्याने तेथे स्वच्छतागृह असु नये अशी नागरीकांची विनंती होती. तसेच याच अनुषंगाने मा.दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा क्रमांक २९/२०१३ अन्वये दावा नागरीकांनी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये न्यायालयाने पुढील कोणताही आदेश पारित केलेला नाही. प्रशासनाकडून वेळोवेळी या शौचालयाचे स्थळ पाहणी वरिष्ठ पातळीवरून झाली असून या अर्धवट बांधकाम झालेल्या इमारतीचा वापर हजेरी सेंटर ग्रंथालय किंवा पोलिस चौकी करता येईल त्यामुळे सदरची इमारत पाडू नये असे प्रशासनाचे मत आहे.

याच विषयाच्या अनुषंगाने पारित मा.सर्वसाधारण सभा दिनांक ११.१२.२०१८, विषय क्र.७७८ नुसार सदरचे अर्धवट बांधकाम केलेले शौचालय निष्काशीत करणे बाबत ठराव पारित झालेला आहे. वर नमुद प्रमाणे दाखल याचिकेमध्ये प्रशासनाकडून या इमारतीचा वापर शौचालयासाठी करण्यात येणार नाही असा जबाब दाखल करण्यात आलेला आहे. प्राथमिक आकलना नुसार या कामासाठी सुमारे रु.३,१८,०३०/- पेक्षा अधिकचा खर्च झालेला असून झालेल्या खर्चाची अदायगी संबंधीत संस्था मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांना करणे आवश्यक आहे.

त्यामुळे वर नमुद प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता शौचालयाची अर्धवट बांधलेली इमारत भिंतीचे बांधकाम करून शौचालया व्यतिरिक्त इतर वापरासाठी म्हणजेच हजेरी सेंटर ग्रंथालय किंवा पोलिस चौकीसाठी किंवा तत्सम वापरासाठी करणे योग्य वाटते. जेणेकरून महानगरपालिकेने या कामावर केलेला खर्च वाया जाणार नाही व या इमारतीचा वापर योग्य त्या कारणासाठी करता येईल. करीता वर नमूद प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या फेर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला व पुरुषांसाठी पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याच्या कार्यक्रमा अंतर्गत शहागंज भागात शहागंज चमन येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांनी शौचालयाची अर्धवट बांधलेल्या इमारतीचा वापर हजेरी सेंटर ग्रंथालय किंवा पोलिस चौकी करता करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच प्राथमिक आकलना नुसार या कामासाठी संस्थेचा सुमारे रु.३,१८,०३०/- पेक्षा अधिकचा खर्च झालेला असून झालेल्या खर्चाची अदायगी संबंधीत संस्था मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांना करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, काठमांडू, नेपाळ येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय थ्रो-बॉल स्पर्धेसाठी

१. मंगेश गोरख साळवे
२. अजय दत्तु देहाडे
३. दिपक अशोक रोकडे
४. देवराणी अशोक खरात
५. निकीता संजय नरवडे

ह्या खेळाडूंची आर्थीक परिस्थती अत्यंत हलाखीची आहे. तसेच या स्पर्धेसाठी नेपाळला जाण्याचा प्रत्येकी खर्च रु.२२,०००/- करू शकत नाहीत. हे पाच विद्यार्थी थ्रो-बॉल स्पर्धेत गुणवंत खेळाडू असून महानगरपालिकेतर्फे ह्या खेळाडूंना नेपाळ येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय थ्रो-बॉल स्पर्धेत जाण्यासाठी आर्थिक मदत मिळावी.

करीता, नेपाळ येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय थ्रो-बॉल स्पर्धेत जाण्यासाठी खेळाडूंना आर्थीक मदत देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.मलके गोकुळसिंग संपतसिंग

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, काठमांडू, नेपाळ येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय थ्रो-बॉल स्पर्धेसाठी मंगेश गोरख साळवे, अजय दत्तु देहाडे, दिपक अशोक रोकडे, देवराणी अशोक खरात व निकीता संजय नरवडे या खेळाडूंना स्पर्धेत नेपाळला जाण्यासाठी महानगरपालिकेतर्फे प्रत्येकी खर्च रु.२२,०००/- आर्थीक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १२६०:-** **(सर्वसाधारण सभा दि.१३.०६.२०१९, का.प.क्र.३२ मधील स्थगीत विषय क्र.१०८०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील बुढ्ढीलेन परिसरातील मिळकत न.भू.क्र.३२०८, नेहरुभवन ही नाट्यगृह इमारत शहरातील नागरीकांना व रंगकर्मी यांच्या सार्वजनिक उपयोगाकरीता तत्कालीन नगरपालिकेने सुमारे ४० वर्षापुर्वी उभारलेली आहे. या इमारतीमध्ये नाट्यगृहाचा वापर कलावंत व रंगकर्मी यांच्याकडून होत नसल्याने या इमारतीचा वापर मागील काही वर्षापासून मुळ उद्देशासाठी होत नाही. सदर इमारत सद्यस्थितीत केवळ लग्न व इतर खाजगी समारंभाकरीता भाडेतत्वावर देणेबाबत शहरातील नागरीकांची मागणी येत होती. या कारणाने सदर इमारतीपासून महानगरपालिकेस अल्प उत्पन्न प्राप्त होत असल्याने व त्या मानाने या इमारतीचा देखभाल दुरूस्ती खर्च

जास्त येत असल्याने सदर बाब महानगरपालिकेस परवडणारी नाही. याच अनुषंगाने शहरातील प्रतिष्ठीत नागरीक व स.नगरसेवक यांची सदर पुनर्विकास करण्याची मागणी करण्यात येत होती.

शहरातील नागरीकांना नवीन अद्यावत असे प्रेक्षागृह व समारंभ हॉल तयार करण्याच्या दृष्टिकोनातून व सदर परिसराचा टी.व्ही.सेंटर येथे उभारण्यात येत असलेल्या शॉपींग कॉम्प्लेक्स व क्रिडांगणाच्या धर्तीवर नेहरूभवन इमारत पाडून त्या ठिकाणी दुकाने, कार्यालये, प्रेक्षागृह व समारंभ हॉल बांधण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदरचा प्रकल्प हा १०० टक्के लोकसहभागातून म्हणजेच या प्रस्तावित संकुलामध्ये बांधण्यात येणारी दुकाने व कार्यालये पुढील ३० वर्षासाठी ठरावीक आरंभीक रक्कम एकत्रितपणे घेऊन त्या द्वारे उभा राहणाऱ्या निधीतून करण्याचे योजिले आहे. या कारणाने महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार येणार नाही. अद्यावत अशा बांधण्यात येणाऱ्या नेहरुभवन इमारतीमुळे या परिसरातील व्यापार व व्यवसाय वृध्दींगत होणार असून यामधून बांधण्यात येणाऱ्या दुकाने व कार्यालये विक्रीनंतर महानगरपालिकेचे अद्यावत असे प्रेक्षागृहे, समारंभ हॉल (मेजवानी हॉल) विनासायस प्राप्त होणार आहे. यामुळे शहरातील नागरीकांना व कलावंतांना एक चांगले व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

नेहरुभवन या जागेचे विकास योजना रस्त्याने बाधीत झाल्यानंतरचे क्षेत्र ४०५० चौमी असून या प्रस्तावित नवीन संकुलामध्ये खालील नमुद प्रमाणे बांधकामाचा समावेश असून त्याचे एकूण बांधीव क्षेत्रफळ ६९४८.५७ चौमी (अंदाजे) असणार आहे.

| **विवरण** | **बांधकाम क्षेत्रफळ (चौमी)** | **जागेचा वापर** | |
|---|---|---|---|
| **भु-मजला** | **१९६०.४६ चौमी** | **वाहनतळ** | **वाहनतळ सुविधा** |
| तळमजला | १६३१.४३ चौमी | एकूण दुकाने २६ | मेजवानी हॉल, वेटिंग रुम, लॉबी, चेजींग रुम, व्हिजीटर रुम, महिला व पुरूषांकरीता स्वतंत्र प्रसाधनगृह. |
| पहिला मजला | २१३१.०२ चौमी | एकुण व्यापारी कार्यालये १२ | ६०० प्रेक्षक क्षमता असलेले प्रेक्षागृह, लाईटिंग साऊंड सिस्टीमसह रुम (ग्रीन रुम) प्रसाधनगृह, लॉबी, चेजींगरूम, व्हिजीटर रुम, मल्टिपर्पज हॉल स्नॅक्स लॉबी इत्यादी. |
| दुसरा मजला | १२२५.६०० चौमी | एकुण व्यापारी कार्यालये १२ | प्रेक्षागृह बाल्कनी व्यतिरीक्त लॉबी, स्नॅक्स, लॉबी, प्रसाधनगृह, गॅलरी. |

वरील परिच्छेदात नमुद प्रमाणे या संकूलात २६ दुकाने, २४ व्यापारी कार्यालये, प्रेक्षागृह आणि मेजवानी हॉल महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना रितसर अटी व शर्तीवर ३० वर्षासाठी भाडेतत्वावर (Lease Rent) देऊन संबंधीतांकडून आगाऊ रक्कम भरणा करून घेऊन उभारण्याचे प्रस्तावित आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेस सदर प्रकल्पाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनूसार अंदाजे रु.१३.२३ कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे. या प्रकल्पातील दुकाने व कार्यालये ३० वर्षासाठी भाडेतत्वावर दिल्यानंतर त्यातून महानगरपालिकेस अंदाजे रु.१७.१२ कोटीचे उत्पन्न अपेक्षीत आहे. तसेच या व्यतिरीक्त ६०० प्रेक्षक क्षमता असलेले प्रेक्षागृह, ६०० ते ७०० माणसे क्षमता असलेला मेजवानी हॉल, पार्किंगची जागा अशी अंदाजे रु.३.५० कोटीची स्थावर मालमत्ता निर्माण होऊन मिळणार आहे. सदरील योजनेतील दुकाने व कार्यालयाचे क्षेत्रफळ हे प्राथमिक स्वरुपाचे असून ते अंदाजीत स्वरुपात घेण्यात आले आहे. यामध्ये प्रत्यक्ष नियोजन करतांना किरकोळ बदल होऊ शकतो.

करीता सदरचा प्रकल्प विकसीत करणे यासाठी प्रकल्पाला तत्वतः मान्यता मिळावी आणि प्रकल्पाचे सविस्तर आर्थिक व तांत्रिक तसेच प्रकल्पाची उपयोगितता तज्ञ व्यक्तींकडून (Financial

and Technical Feasibility through Independent Expert) एजन्सीकडून करून घेण्याच्या मान्यतेस्वत सादर.

**चर्चा:-**

श्री.विकास जैन :शहरातील बुढ्ढीलेन परिसरातील मिळकत न.भू.क्र.३२०८, नेहरुभवन या इमारतीच्या ठिकाणी प्रकल्प विकसीत करणे व त्या अनुषंगाने इतर कामे करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभा दिनाक १३.०६.२०१९, विषय क्रमांक-१०८० स्थगीत ठेवण्यात आला होता. सदरील काम करणे अत्यावश्यक असल्याने सदरील स्थगीत ठेवण्यात आलेला विषय मंजुर करण्यात यावा.

मा.महापौर :स.श्री.विकास जैन यांनी सुचविल्यानुसार सदरील काम करणे अत्यावश्यक असल्याने सर्वसाधारण सभा दिनांक १३.०६.२०१९, का.प.क्र.३२ मधील स्थगीत ठेवण्यात आलेला विषय क्र.१०८० मंजुर करण्यात येतो. प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील बुढ्ढीलेन परिसरातील मिळकत न.भू.क्र.३२०८, नेहरुभवन या इमारतीचे ठिकाणी प्रकल्प विकसीत करणे व त्या अनुषंगाने इतर कामे करण्याबाबतचा सर्वसाधारण सभा दिनांक १३.०६.२०१९, का.प.क्र.३२ मधील स्थगीत ठेवण्यात आलेल्या प्रस्तावास याद्वारे मंजुरी देण्यात येते. पुनर्विकास करण्यासाठी प्रकल्प विकसीत करणे यासाठी प्रकल्पाला मान्यता देण्यात येते आणि सदरील प्रकल्पाचे सविस्तर आर्थिक व तांत्रिक तसेच प्रकल्पाची उपयोगितता तज्ञ व्यक्तींकडून (Financial and Technical Feasibility through Independent Expert) एजन्सीकडून करून घेण्यास मान्यता देण्यात येते. प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपविल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद